7694

जा.क्र./ लाशमनपाला/कोवि/ /2023-24
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
कोंडवाडा विभाग,
दिनांक :- 6 /12/2023

## ई-कोटेशन

प्रति,

-----------------------------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

**विषय :-लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील मोकाट/ बेवारस /आजारी फिरणारे जनावरे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी जनावरे पकडणे, मोकाट जनावरांचे संगोपन करणे, आजारी जनावारांना औषधोपचार करणे या कामासाठी संस्थेची आर्धा एकर जागा, वाहन व मनुष्यबळासहित कंत्राटी पध्दतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था खाजगी अभिकर्तांची नियुक्ती करणे बाबत.**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, या कार्यालयाचे कोंडवाडा विभागाकरिता खालील नमुद केलेला तपशिल **लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील मोकाट/ बेवारस /आजारी फिरणारे जनावरे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी जनावरे पकडणे, मोकाट जनावरांचे संगोपन करणे, आजारी जनावारांना औषधोपचार करणे या कामासाठी संस्थेची आर्धा एकर जागा, वाहन चालक, मनुष्यबळासहित कंत्राटी पध्दतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था खाजगी अभिकर्तांची नियुक्ती करणे** करिता बंद लिफाफ्यातून दि. 14/12/ 2023 रोजी दुपारी 05:30 वाजता मा. आयुक्त, मनपा, लातूर यांच्याकडे पोहचतील असे दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

कोटेशन दि. 18/12/2023 रोजी दुपारी 05:00 वाजता उघडण्यात येवून मान्य असलेल्या सदरील ई कोटेशन नोंदणीकृत गोरक्षण संस्था स्वंयसेवी सेवाभावी संस्था/(NGO)/महिला बचतगट,मजूर सहकारी संस्था , बेरोजगार संस्था यांना या कोटेशन फक्त महानगरपालिकेच्या कोटेशन भरणा-या ठेकेदारांना संबंधित काम करण्याची आदेश देण्यात येईल. आदेश दिल्यानंतर ----------- दिवसाच्या आत काम करावे लागेल.

**नियम व अटी-**

**मोकाट /बेवारस / आजारी जनावरे पकडणे, पकडलेल्या आजारी जनावारास औषधोपचार करणेसाठी संस्थेचे स्वत:ची जागा, वाहन व मनुष्यबळ सहित कोटेशन**

१. मुदतीत प्राप्त न झालेले अथवा अटी असलेले कोटेशन स्विकारले जाणार नाही.
२. प्रथम कामाची मुदत कोटेशन मान्य झाल्यापासून १ वर्ष कालावधीसाठी राहील. कामाचे स्वेरुप व काम समाधानकारक असल्यास मुदत वाढवून देण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांना राहिल.

३. कामे कोटेशन रक्कमेच्या १% (अनामत रक्कम रू. ७०००/-) रोखीने मनपा फंडात जमा करून पावती कोटेशन सोबत सादर करावी.

४. संबंधीत ठेकेदाराचे (दर) मंजूर झाल्यास शासनाचे नियमानुसार स्टँम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल. करारनामा मान्य झाल्यानंतर कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात येतील. त्यानंतरच कामे हाती घेण्यात यावे.

५. कोटेशन धारकाने मोकाट / बेवारस/ आजारी जनावरे पकडण्यासाठी स्वत:चे वाहन, चालकासहीत मनुष्यबळ व पकडलेल्या मोकाट जनावाराचे संगोपन करण्यासाठी स्वतचे किंवा भाडयाने घेतेलेले कोंडवाडा म्हणून अर्धा एकर रोड लगत मोकळी जागा, शेड, वॉल कंपाऊंड, चारा व पाणी, सर्व सोयीयुक्त व्यवस्था उपलब्ध असणाऱ्या किंवा उपलब्ध करून घेण्याची क्षमता असणाऱ्यां नोंदणीकृत गोरक्षण संस्था नोंदणीकृत स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था उपरोक्त सर्व सोयीयुक्त असणे आवश्यक आहे.

६. मोकाट / बेवारस/ आजारी जनावरे पकडून आणल्यानंतर जनावाराचे संगोपन व्यवस्थीत नियमाप्रमाणे करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीताची राहील.

७. कोंडवाडयात मोकाट / बेवारस/ आजारी जनावरे दाखल केल्यानंतर तज्ञ पशुवैद्यकिय अधिकारी कडून औषाधोपचार करणे आवश्यक आहे. (औषधोपचार खर्च संबंधीत संस्थेकडून करावा लागेल.)

८. मोकाट / बेवारस/ आजारी जनावरे कोंडवाडयात दाखल केल्यानंतर जनावर मृत झाल्यास त्याचे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे ही जबाबदारी संस्थेची/ ठेकेदाराची राहील.

९. बंदीस्त केलेल्या जनावरास सात दिवसाच्या आत जनावर मालक जनावर घेऊन जाण्यास न आल्यास असे बेवारस जनावरे यांना कायमस्वरूपी संगोपनासाठी नियमाप्रमाणे संस्थेकडे वर्ग करण्यात येतील व प्रशासनाच्या आदेशानुसार कार्यवाही करावी लागेल.

१०. संस्थेने किमान प्रति दिवस १० जनावरे बंदिस्त करणे आवश्यक आहे.

११. मोकाट पकडून आणलेल्या जनावराचे संगोपन करण्यासाठी प्रति जनावर प्रति दिवस रू. ५००/ प्रमाणे ७ दिवसापर्यंतचा संगोपन खर्च महानगरपालिका **ठराव क्र. ५९, दि. ३०/११/२०२२** नुसार मनपाकडून संस्थेस/ ठेकेदारास देयक अदा केले जाईल.

१२. मोठया गाईबरोबर २ वर्षापर्यंतचे वासरू असल्यास त्याचे संगोपन खर्च अदा केले जाणार नाही.

१३. लातूर शहरातील नागरिकांनी मनपा हद्दीत २४ तासात केंव्हाही मोकाट जनावरांची किंवा पिसाळलेल्या जनावराची तक्रारी केल्यास तक्रार प्राप्त होताच त्वरीत त्याचा निपटारा करणे संस्था चालकास बंधनकारक राहील.

१४. दैनिक कामाचा अहवाल कोडवाडा प्रमुख, लातूर शहर महानगरपालिक, लातूर यांच्यालकडे सादर करावा लागेल.

१५. जमा केलेल्या जनावरांच्या आवश्यक नोंदी व उपचार नोंदवही ठेवण्याची जबाबदारी संस्था/ ठेकेदार यांची राहील.

१६. मोकाट / बेवारस/ आजारी जनावरे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी पकडण्यासाठी लागणारी आवश्यक ते साहित्य, वाहन कंत्राटदाराने स्वत: उपलब्ध करून घ्यावे.

१७. जनावरे पकडण्याची शास्त्रीय पध्दत असावी. कोणत्याही प्रकारच्या रसायनाचा वापर करता येणार नाही. पकडण्यात आलेल्या जनावराची नोंद योग्य रितीने घ्यावी यासाठी टॅग पध्दत अथवा मनपा निर्देशित करील ती पध्दत अवलंबवावी लागेल.

१८. किमान १० कामगार व १ मोठे वाहन (महिंद्रा पिकअप किंवा ४०७) रॅम्प सहित बंद टप असलेला वाहन व वाहन चालक याचा वापर करून जनावरे पकडण्यासाठी वापर करावा. वाहनाचे सर्व कागदपत्र ड्रायव्हर लायसन्स सहित संस्थेने सादर करावे.

१९. मा. मंत्री / अति महत्वचे व्यक्ती यांचे दौरे व धार्मिक सन महोत्सव व मिरवणुका या प्रसंगी कार्यालयीन आदेशाप्रमाणे काम करावे लागेल.

२०. कामाचा व्याप पाहता कामगार कमी किंवा जास्त करता येईल.

२१. नागरिकांनी केलेल्या तक्रारीचे निवारण संस्थेने त्वरीत न केल्यास संस्थेविरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. व त्यांनी ठेवलेल्या अनामत रक्कमेमधून किंवा त्यांच्या देयकामधून रक्कम वसूल केली जाईल.

२२. सहकर्मचारी/ कॅचर्स हे योग्य शिक्षीत व प्रशिक्षित असावेत.

२३. संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानुसार वेतन दयावे लागेल. कामगार/ कर्मचारी कायदयाचे पालन करावे लागेल. त्यांचा विमा/ संरक्षण / ESIC/ EPF इ. बाबीची पुर्तता करणे कोटेशन धारकास बंधनकारक राहील.

२४. कोटेशन धारकास बाल कामगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत बालकामगार लावता येणार नाहीत.

२५. संस्थेस मोकाट जनावरे बंदीस्त करण्याचा कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

२६. मोकाट जनावरे पकडताना कोणताही अपघात, धार्मिक भावना दुखावणे इ. घटना घडल्यान संबंधीत पूर्णपणे जबाबदार असतील.

२७. कोटेशन धारकांकडे काम करणा-या कामगारांना महानगरपालिका प्रशासन सेवेत कोणत्याही पदाव नौकरी मागण्याचा हक्क राहणार नाही व महापालिका सेवेत समावून घेतले जाणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही

२८. कोटेशन दाखल केल्यानंतर काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अथवा कंत्राटाचे काम मुदतीपूर्वी सोडण्यात आल्यास अनामत रक्कम जप्त करन कोटेशन प्रक्रियेसाठी झालेल्या खर्चाची रक्कम वसूल करण्यात येईल.

२९. लेबर ॲक्टचे पालन करण्याची जबाबदारी कोटेशन धारकाची राहील .

३०. मोकाट जनावरे पकडणा-या कामगारांना युनीफॉर्म असावा व आपल्या नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्याची नावाची यादी संपूर्ण पत्यासहीत कार्यालयात सादर करावी लागेल. तसेच वेळोवेळी कामगार बदलले असतील तर सुची कार्यालयात सादर करावी लागेल व त्यांचे ओळखपत्र सादर करावे जसे मतदान ओळखपत्र, आधार कार्ड, ड्रॉव्हींग लायसन्स इ. जनावरे पकडताना सर्व कर्मचा-यांचे ओळखत्र सोबत असावे.

३१. मोकाट / बेवारस/ आजारी जनावरे दाखल केल्यानंतर जनावरे चोरी गेल्यास किंवा जमा केलेल्या संख्येपेक्षा जनावराची संख्या कमी आढळल्यास किंवा पकडून दाखल केलेल्या जनावरांसंबंधी काही अप्रिय घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची /ठेकेदाराची राहील.

३२. कोटेशन धारकाने सदर कामासाठी शारिरिक दृष्टया सुदृढ कामगार नेमावे.

३३. पाळीव प्राणी जनावरा संबंधी महाराष्ट्रि प्राणी संरक्षण कायदा १९७६ महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायदा १९९५ प्रमाणे व इतर लागू असलेले सर्व संबंधीत नियम व अधिनियमातील अटींचे पालन करणे कोटेशन धारकास बंधनकारक राहील.

३४. जनावाराच्या संख्येनुसार कामगार कमी जास्त करणे याची सर्वस्वी जबाबदारी संस्था/ ठेकेदाराची राहील.

३५. संस्थेने नियुक्त केलेले कामगार यांना दुखापत किंवा इतर घटना घडल्यास निविदाधारक पुर्णपणे जबाबदार राहिल.

३६. गरजे प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाचे कर्मचारी/अधिकारी योग्यय मदत सहकार्य करतील.

३७. लेबर ॲक्टकचे पालन करण्याची जबाबदारी कोटेशन धारकाची राहील.

३८. प्रती महिन्याच्या कामाचे देयक स्वनतःह सादर करावे लागेल. आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कांही कारणास्तिव देयकाची रक्किम देण्यावस विलंब झाल्यालस त्याआवर कोणत्याही प्रकारचे व्यायज मागण्या चा अधिकार कोटेशन धारकास राहणार नाही.  निधीच्या उपलब्ध्तेप्रमाणे देयक अदा केले जातील.  या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत काम बंद ठेवता येणार नाही.

३९. सुरक्षा अनामत ३ % चालू देयकातून कपात करून घेण्यात येईल. व सदरील ३ % अनामत रक्कम कामाच्या दोष दायीत्व निवारण कालवधी संपल्यानंतर ६ महिन्याने सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यानंतर परत केले जाईल. संबंधीत ठेकेदाराचे दर मंजूर झाल्यास शासनाचे नियमानुसार स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.

४०. सदरील कामी कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्काम दिली जाणार नाही.

४१. सदर कार्य हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्यामुळे व सार्वजनिक हिताचे असल्यामुळे कंत्राटदाराला कोणत्याही परिस्थितीत महानरगपालिका, लातूर सबळ कारणासह पुर्व सुचना न देता काम बंद करता येणार नाही अथवा एकतर्फी कंत्राट सोडून देता येणार नाही. तसे केल्यास कंत्राटदाराची सुरक्षा अनामत रक्करम व देय असलेली सर्व देयके जप्त करण्यात येतील व त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याकत येईल व प्रसंगी कंत्राटदाराविरुध्दी महापालिकेची फसवणूक केली म्हणून कायदयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४२. कंत्राटदाराच्या कामाबाबत तक्रार असल्यास व काम समाधानकारक न आढळल्यास कंत्राटदारावर दंडात्मदक कार्यवाही करण्यारचा किंवा कंत्राट रद्द करण्यारचा अधिकार आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका,  लातूर यांचेकडे सुरक्षित आहे.

४३. याबाबत केलेल्या कामाचे अद्यावत रेकॉर्ड ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व वेळोवेळी रेकॉर्डची मागणी केल्यास देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

४४. अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र

४५. उपरोक्त सर्व अटी व वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेश/निर्देश/सुचनांचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

४६. अधिक माहितीसाठी कोंडवाडा विभाग यांच्याशी संपर्क साधावा

**कोटेशन सादर करावयाची पध्दत खालील प्रमाणे-**

**अ) लिफाफा क्र. 01 (तांत्रीक)**

Technical व Technical Documents बंद लिफाफ्यात सादर करावे.

1) कामाची 1% अनामत रक्कम रू. 7000/- नगदी ने या कार्यालयात जमा केलेली पावती
2) कोटेशन फिस रू. 500/- नगदी ने या कार्यालयात जमा केलेली पावती
3) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
4) संस्थेचे पॅन कार्ड
5) जी.एस.टी. प्रमाणपत्र
6) *EPF, ESIC* नोंदणी प्रमाणपत्र
7) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणापत्र
8) संस्थेच्या वाहनाचे कागदपत्रे

**ब) लिफाफा क्र. 02 (आर्थिक)**

1) लिफाफा क्र. 02 मध्ये कामाचे दर भरून सादर करावे.

उपायुक्त

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

## कोटेशन दर पत्रक

प्रति.

मा.आयुक्त,
लातूर शहर महानगरपालिका लातूर.

**विषय : लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावरील मोकाट/ बेवारस /आजारी फिरणारे जनावरे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी जनावरे पकडणे, मोकाट जनावरांचे संगोपन करणे, आजारी जनावारांना औषधोपचार करणे या कामासाठी संस्थेची आर्धा एकर जागा, वाहन व मनुष्यबळासहित कंत्राटी पध्दतीवर नोंदणीकृत गोरक्षण संस्था, स्वयंसेवी सेवाभावी संस्था, महिला बचत गट, मजूर सहकारी संस्था, बेरोजगार संस्था खाजगी अभिकर्ताची नियुक्ती करणे**

**संदर्भ- जाहिर कोटेशन सुचना जा.क्र. लाशामनपा/कोंडवाडा विभाग/ दि / /२०२१**

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय प्रसिध्द जाहिर कोटेशन सुचने प्रमाणे लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट/बेवारस/आजारी फिरणा-या जनावरांना पकडून कोंडवाडयात दाखल करणे, पकडलेल्या जनावाराचे संगोपन करणे कोटेशनमधील शर्तीच्या नियम व अटी मान्य करुन वेळोवेळी दिलेल्या सुधारीत आदेशाचे/नियमांचे व सुचनांचे पाल करण्याचे अटीवर प्रथम एक वर्षासाठी कंत्राट घेऊ इच्छितो.

**संस्थेची स्वत: ची कोंडवाडयासाठी जागा / भाडेतत्वारील जागा, मनुष्यबळ, वाहनासहित दर**

| अ.क्र. | कामाचे नाव | *प्रति जनावरांचे मागणी* केलेले कामाचे दर रू. |
|---|---|---|
| १ | लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यावर मोकाट /बेवारस/आजारी फिरणारे उदा. गाय, बैल, म्हैस, रेडा, शेळी, गाढव व इत्यादी जनावरे पकडणे **प्रति जनावर** | रू. ------------ |
| २ | कोंडवाडयातील मोकाट/ बेवारस/ आजारी जनावारांचे संगोपन करणे **प्रति दिवस प्रति जनावर** | रू. ५००/- |
| ३ | कोंडवाडयातील मोकाट/ बेवारस/ आजारी जनावरास औषधोपचार करणे. लहान जनावरे, मोठे जनावरे **प्रति जनावरे** | रू. ------------ |
| ४ | कोंडवाडयात मृत झालेल्या जनावारांचे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणे. **प्रति जनावर** | रू. ------------ |

**कोटेशन धारक अर्जदार**

नाव : ------------------------------------

संस्थेचे नाव : ------------------------------

पत्ता : --------------------------------------

मोबाईल क्र. -------------------------------

ई-मेल --------------------------------------